निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३०२ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * रविवार दि.०८ मार्च २०२६ | * पाने-४

## नक्षल चळवळीला मोठा हादरा! ३१ मार्चच्या डेडलाइनपूर्वीच १३० नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण



**आत्ताच एक्सप्रेस**

**गडचिरोली** – देशातील नक्षलवाद पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ ची 'डेडलाइन' निश्चित केली असतानाच, तेलंगणाची राजधानी हैदराबादमध्ये नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला आहे. शनिवारी एका विशेष कार्यक्रमात प्रतिबंधित नक्षलवादी संघटनेच्या १३० नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यासमोर शस्त्रे खाली ठेवून आत्मसमर्पण केले. यामध्ये अनेक बड्या नेत्यांचा समावेश असून, मोठ्या प्रमाणात अत्याधुनिक शस्त्रास्त्रेही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च नेता पॉलीट ब्युरो सदस्य देवजी, केंद्रीय समिती सदस्य संग्राम याच्यासह चार नेत्यांनी आत्मसमर्पण केले होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे समाप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांची वाढती कारवाई आणि सरकारच्या प्रभावी पुनर्वसन धोरणामुळे नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडल्याचे चित्र दिसत आहे. एका बाजूला अनेक भागांत चकमकींमध्ये नक्षलवादी मारले जात असताना, दुसरीकडे मोठ्या संख्येने नक्षलवादी मुख्य प्रवाहात परतत आहेत. या सामूहिक आत्मसमर्पणाला नक्षलविरोधी मोहिमेतील ऐतिहासिक यश मानले जात आहे.

आत्मसमर्पण करणाऱ्या १३० जणांपैकी १२५ नक्षलवादी छत्तीसगडमधील आहेत, तर ४ तेलंगणा आणि १ आंध्र प्रदेशचा आहे. यामध्ये संघटनेच्या धोरण निश्चितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे ३ राज्य समिती सदस्य, १० विभागीय समिती सदस्य, ४६ एरिया कमिटी सदस्य आणि ७६ दलम सदस्यांचा समावेश आहे. आत्मसमर्पणावेळी नक्षलवाद्यांनी ३१ ए.के.-४७ रायफल्स, २१ इन्सास रायफल्स, २० एसएलआर रायफल्स आणि एक इन्सास एलएमजी रायफल यांसह मोठ्या प्रमाणात दारूगोळा प्रशासनाकडे सुपूर्द केला.

या प्रसंगी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी आत्मसमर्पण करणाऱ्यांचे स्वागत केले. महात्मा गांधींच्या या देशात हिंसक आणि सशस्त्र मार्गाने कोणत्याही समस्येचे निराकरण होऊ शकत नाही. भरकटलेल्यांनी आता लोकशाही आणि शांततेच्या मार्गावर परतावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांनी नक्षलवाद्यांना 'बुलेट'चे राजकारण सोडून 'बॅलेट'च्या राजकारणात सहभागी होण्याचे आवाहन केले. लोकशाहीत जनतेची सेवा आणि हक्कांची लढाई लढण्याचे निवडणूक हेच सर्वात मोठे माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

नक्षलवादी संघटनेचा सर्वोच्च नेता गणपती यानेही हिंसेचा मार्ग सोडावा, सरकार त्याला पूर्ण सुरक्षा आणि सन्मानजनक पुनर्वसन देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. राज्य सरकार आत्मसमर्पण करणाऱ्यांना रोजगार, शिक्षण आणि सुरक्षेसह सर्वतोपरी मदत करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. गेल्या काही वर्षांत नक्षलग्रस्त भागात झालेली विकासकामे, रस्ते आणि आरोग्य सुविधांमुळे नक्षलवाद्यांचा जनाधार घटत चालल्याचे या मोठ्या शरणागतीवरून स्पष्ट होत आहे.

## सर्वच बँकांचे पीककर्ज होणार माफ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर** – ज्या बँकांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, त्या बँकांतून पीक कर्ज घेतलेल्या सर्वच शेतकऱ्यांना सरकारच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. यामुळे सरकारच्या कर्जमाफीचा लाभ कोणकोणत्या शेतकऱ्यांना मिळणार? याविषयीची संभ्रमावस्था संपुष्टात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पण या कर्जमाफीचा लाभ कोणत्या बँकांकडून घेतलेल्या पीक कर्जावर मिळेल याविषयी वेगवेगळे दावे-प्रतिदावे केले जात होते. पण आता मुख्यमंत्र्यांनी स्वतः याविषयीची स्थिती स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, मी शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली आहे. त्यामुळे त्याबद्दल कुणाच्याही मनात संभ्रम नाही. काही लोक वेगवेगळ्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करतात. कुणी म्हणतो राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज माफ होणार नाही, कुणी म्हणतो जिल्हा बँकेचे होणार नाही, कुणी म्हणतो या सोसायटीची होणार नाही, कुणी म्हणतो त्या सोसायटीची होणार नाही.

पण सरकारने पीक कर्ज देण्याचा अधिकार असणाऱ्या कोणत्याही बँकेने दिलेले २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ आमचा प्रयत्न हा आहे की, माफी शेतकऱ्याला द्यायची आहे बँकेला नाही. त्यामुळे या निर्णयाचा फायदा शेतकऱ्याला व्हावा यासाठी काम सुरू आहे. आम्ही यापूर्वीच सांगितले आहे की, ३० जूनच्या आधी आपण कर्जमाफी करणार आहोत. त्यामुळे आता ही घोषणा बजेटमध्ये करण्यात आल्यामुळे पुढच्या कारवाईला सुरुवात होईल. समिती यावर काम करत आहे. ही समिती यासंबंधीच्या सगळ्या गोष्टी सांगेल. मी एवढेच सांगतो की, ही कर्जमाफी यापूर्वीच्या सर्वच कर्जमाफीच्या निर्णयांहून चांगली आहे.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भासाठी गेमचेंजर ठरणार असल्याचाही दावा केला. कालच्या अर्थसंकल्पात संपूर्ण महाराष्ट्राला भरभरून मिळाले आहे. जेव्हा महाराष्ट्राला भरभरून मिळते, तेव्हा विदर्भ कसा मागे राहील. विदर्भासाठी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भासाठी गेम चेंजर ठरेल. हा प्रकल्प आतापर्यंतच्या आपल्या इतिहासातील सगळ्यात मोठा नदीजोड प्रकल्प आहे. त्याला प्रशासकीय मान्यता देऊन त्याचा आपण अर्थसंकल्पात समावेश केला आहे. त्यामुळे विदर्भाचे चित्र पूर्णपणे बदलेल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी माध्यमांना इराण विरुद्ध इस्त्रायल – अमेरिका युद्धावर नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होईल असे चित्र निर्माण न करण्याचेही आवाहन केले. माझी माध्यमांना विनंती आहे की, नागरिकांमध्ये विनाकारण भीतीचे वातावरण करू नये. जी काही परिस्थिती आहे, ती केंद्र सरकार हाताळत आहे. ती केंद्र सरकार सांगत आहे. विनाकारण वेगवेगळ्या बातम्या दाखवून हे घडणार, ते घडणार असे सांगून नागरिकांच्या मनात भीती व संभ्रम तयार करणे हे देशाच्या व समाजाच्या नाही. केंद्र सरकारनेही काल हेच स्पष्टपणे सांगितले आहे, असे ते म्हणाले.

## युद्धाचा भडका, सर्वसामान्यांना महागाईचा चटका!; घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमती महागल्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष हा दिवसागणिक वाढताना दिसत आहे. या संघर्षामुळं मात्र प्रत्यक्ष युद्धात सहभागी नसलेल्या देशांनाही या युद्धजन्य परिस्थितीचा सामना करावा लागतोय. अशातच आता युद्धाचा जागतिक बाजारपेठेवर परिणाम होत असून जगासमोर नवं संकट निर्माण झालं आहे. त्याची झळ अगदी भारताला देखील बसू लागली आहे. अशातच आता राज्यातील घरघुती गॅस सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. परिणामी, महाराष्ट्रात ८६० रुपयांना मिळणारं सिलेंडर गॅस आता ९२० रुपयांना मिळणार आहे. आजपासून हे दर लागू होणार असल्याची माहिती आहे. १४.२ किलोच्या घरघुती गॅस सिलेंडरच्या किमतीमध्ये आजपासून हि दरवाढ लागू होणार आहे.

भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा एलपीजी आयात करणारा देश आहे. गेल्या वर्षी, देशाने अंदाजे ३३.१५ दशलक्ष मेट्रिक टन स्वयंपाकाच्या गॅसचा वापर केला. एलपीजी हे प्रोपेन आणि ब्युटेनचे मिश्रण आहे. देशाच्या एकूण एलपीजी गरजांपैकी जवळजवळ दोन तृतीयांश गरजा आयातीद्वारे पूर्ण केल्या जातात, या पुरवठ्यापैकी अंदाजे ८५-९०% मध्य पूर्वेतून येतात. अशातच इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतल्यानं जागतिक बाजारपेठेतील जवळजवळ सर्वच क्षेत्रापुढं नवी समस्या निर्माण झाली आहे. अशातच घरघुती गॅस सिलेंडरच्या किमती ६० रुपयांनी वाढल्यामुळे त्याचा थेट फटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार आहे.

## जागतिक तणावात भारताने संवाद व शांततेसाठी प्रयत्न करावेत; ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे पंतप्रधानांना पत्र

**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर** – सध्या जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून भारताने जागतिक स्तरावर शांतता व संवाद वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले आहे.

अमेरिका-इस्त्रायल व इराण यांच्यामधील सध्याच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक हजारे यांनी पंतप्रधानांना हे पत्र आज, शनिवारी पाठवले आहे. अण्णा हजारे सध्या राळेगणसिद्धी येथे आहेत. अण्णा हजारे यांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या पत्रात सध्याची जागतिक परिस्थिती अतिशय चिंताजनक असल्याचे नमूद केले आहे. विविध देशांमधील वाढता तणाव व संघर्ष यामुळे सामान्य नागरिकांचे जीवन असुरक्षित होत चालले आहे. या घटनांमधून निरपराध महिला, बालके, त्यांचे कुटुंबीय यांच्यावर होणारा परिणाम हा अतिशय दुःखदायक व वेदनादायी ठरतो असल्याकडे लक्ष वेधले आहे.

भारताची संस्कृती ही अहिंसा व शांततेची आहे. आपल्या देशाने नेहमीच जागतिक परस्पर संवाद व शांतता याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. भारतासारख्या मोठ्या लोकशाहीवादी देशाने मानवता व शांततेचा संदेश देणे अत्यंत आवश्यक असल्याचे हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे. आज जगातील देशांना शस्त्रास्त्रे नव्हे तर परस्पर विश्वास व संवाद आवश्यक आहे. युद्धातून केवळ विनाश होतो, परंतु संवादातून समाधान व स्थिरता याचा मार्ग दाखवला जातो. माझी आपल्याला विनंती आहे की, भारताने तटस्थ व जबाबदार भूमिका स्वीकारत जागतिक शांतता व संवाद वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने जागतिक स्तरावर अनेक मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका बजावली आहे. सध्याच्या जागतीक तणावाच्या संवेदनशील परिस्थितीत भारताची मानवतावादी व शांततेच्या मार्गाची भूमिका जगासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. मानवतेचे हित व निरपराध नागरिकांची सुरक्षा यासाठी भारताने शांततेच्या मार्गाने पुढे जावे असेही आवाहन पत्रात हजारे यांनी पंतप्रधानांना केले आहे.

ज्येष्ठ समाजसेवकांना हजारे यांनी देशातील भ्रष्टाचार, निवडणूक पद्धत, मतदानाचा अधिकार, माहिती अधिकार, लोकपाल विधेयक, दारूबंदी आदी सुधारणांसाठी वेळोवेळी लोकसहभागातून आंदोलने करून सरकारला कायद्यात बदल करणे भाग पाडलेले आहे. त्यासाठी गावपातळीपासून थेट दिल्लीपर्यंत आंदोलने केली आहेत. त्यांच्या आंदोलनामुळे महाराष्ट्रातील काही मंत्र्यांना राजीनामेही द्यावी लागले आहेत.

## भारताचा उदय दुसरं कोणी ठरवू शकत नाही; भारताने अमेरिकेला ठणकावले

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली**– भारत आणि अमेरिकेतील बहुप्रतीक्षित व्यापार करारावर काही दिवसांपूर्वी शिक्कामोर्तब झालं. याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही अनेकदा भाष्य केलं. एवढंच नाही तर त्यानंतर अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क ५० टक्क्यांऐवजी १८ टक्के करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आता भारत-अमेरिका व्यापार कराराच्या अनुषंगाने अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांनी नुकतंच केलेलं एक वक्तव्य चर्चेत आलं आहे.

'भारत आणि अमेरिका व्यापार करारामध्ये अमेरिका राष्ट्रीय हीत प्रथम ठेवणार असून आम्ही २० वर्षांपूर्वी चीनशी केलेल्या चुका आता भारतासोबत होऊ देणार नाहीत', असं ख्रिस्तोफर लँडौ यांनी म्हटलं होतं. दरम्यान, ख्रिस्तोफर लँडौ यांच्या या वक्तव्याला आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

'भारताचा उदय दुसरं कोणी ठरवू शकत नाही. भारत स्वतःचा उदय स्वतः करेल', अशा शब्दांत भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांना ठणकावलं आहे. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे.

अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांनी केलेल्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना मंत्री एस.जयशंकर यांनी म्हटलं की, "जागतिक स्तरावर भारताचा उदय इतर देशांच्या चुकांमुळे नव्हे तर स्वतःच्या क्षमतेमुळे होईल. भारताचा उदय भारतच निश्चित करेल आणि तो आपल्या ताकदीने निश्चित केला जाईल, इतरांच्या चुकांनी नाही." "अमेरिका भारताबरोबरच्या व्यापार करारामध्ये 'अमेरिका फर्स्ट' हेच धोरण अवलंबवणार आहे. भारताबरोबर आर्थिक संबंध आणि व्यापार वाढवताना अमेरिका स्वतःच्या राष्ट्रीय हितांना प्राधान्य देईल आणि दोन दशकांपूर्वी केलेल्या चुका टाळेल. २० वर्षांपूर्वी आम्ही चीन संदर्भात केलेल्या चुका आता भारतासोबत होऊ देणार नाही. कारण अमेरिकेने तेव्हा आपल्या बाजारपेठा खुल्या केल्या होत्या आणि त्यानंतर विविध क्षेत्रांत चीनने अमेरिकेला मागे टाकलं. त्यामुळे आता अमेरिका फर्स्ट हेच धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचं प्रशासन राष्ट्रीय हिताला सार्वभौम राज्यांमधील सामायिक तत्व मानतं. जसं राष्ट्राध्यक्ष ट्रम्प अमेरिकेला पुन्हा महान बनवू इच्छित आहेत. तसेच भारताचे पंतप्रधान किंवा इतर नेत्यांकडून त्यांचे देश पुन्हा महान बनवण्याची अपेक्षा करतील", असं ख्रिस्तोफर लँडौ यांनी म्हटलं होतं.

## भारताला परवानगी देणारी अमेरिका कोण?, पीएम मोदी अमेरिकेच्या तालावर का नाचताहेत?, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा घणाघात



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई**– अमेरिकेने इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताला रशियाकडून पुढील ३० तेल खरेदी करण्याची मुभा दिली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अमेरिकेच्या या निर्णयावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रातील रालोआ सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. भारताला परवानगी देणारी अमेरिका कोण? भारताचे पंतप्रधान अमेरिकेच्या तालावर का नाचत आहेत? असा संतप्त सवाल यांनी त्या प्रकरणी केला आहे.

अमेरिकेच्या वित्त विभागाने (ट्रेझरी डिपार्टमेंट) भारतीय रिफायनरींना रशियन तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची परवानगी दिली आहे. ही मुदत ४ एप्रिल २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे. इराण विरुद्ध इस्त्रायल – अमेरिका युद्धामुळे जागतिक तेल पुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमेरिकेने ही कथित सवलत दिली आहे. पण अमेरिकेची ही सवलत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारसाठी चांगलीच डोकेदुखी ठरली आहे. विरोधी पक्षांनी या प्रकरणी मोदींवर शरसंधान साधत भारताचे सार्वभौमत्व अमेरिकेकडे गहाण टाकल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन सपकाळ यांनीही मोदींवर तोंडसूख घेतले आहे.

हर्षवर्धन सपकाळ शनिवारी सकाळी एका पोस्टद्वारे म्हणाले, भारताला परवानगी देणारा अमेरिका कोण? हा भारताच्या सार्वभौमत्वाचा अपमान, आपल्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणातील फोलपणा नाही का? भारताचे पंतप्रधान अमेरिकेच्या तालावर का नाचताहेत? पंतप्रधान नरेंद्र मोदी एपस्टिन फाईल मुळे अमेरिकेसमोर कॉम्प्रमाईज्ड होऊन भारत देशाचा अपमान करत आहेत.

हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला होता. त्यात त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर व पीएम मोदींचा एक फोटो पोस्ट करत सरकारवर उपरोधिक टीका केली होती. सपकाळ यांनी शेअर केलेल्या फोटोत मोदींच्या पाठीवर तडजोड करणारा अशी पट्टी लावली आहे. त्यांच्या हातात अमेरिकेच्या परवानगीचा एक कागदही दिसत आहे. त्यावर शाब्बास... तुम्ही परंपरा जपली, असे सावरकर मोदींना म्हणताना छायाचित्रात दिसून येत आहे. हर्षवर्धन सपकाळ यांची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे हर्षवर्धन सपकाळ यांनी यापूर्वीही स्वातंत्र्यवीर सावरकरांवर छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप केला होता. सहा सोनेरी पाने या पुस्तकात शिवाजी महाराजांबद्दल खूप चुकीचे लिहले आहे. शिवाजी महाराजांच्या सज्जनपणाला विकृती म्हणण्याचे धाडस सावरकर यांनी केले आहे. स्वराज्य हे स्थापन होणारच होते. पण कावळा बसायला आणि डांग तुटायला, त्याप्रकारे शिवाजी महाराज आले, असे सावरकरांनी त्या पुस्तकात लिहले आहे. असे लिहणारे सावरकर भाजपला चालतात. गोंधळ निर्माण करणे हे भाजपचे धोरण आहे, असे हर्षवर्धन सपकाळ या प्रकरणी म्हणाले होते.

## महिलांच्या तक्रारींसाठी पोर्टलचे अनावरण, एका क्लिकवर नोंदवता येणार तक्रार; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची माहिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी महिलांची सुरक्षा, हक्क आणि आत्मनिर्भरता या विषयांवर मान्यवरांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या महिला सन्मान पोर्टलचे अनावरण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या पोर्टलच्या माध्यमातून आता महिलांना घरबसल्या एका क्लिकवर आपली तक्रार नोंदवता येणार आहे. हे पोर्टल थेट पोलिस यंत्रणेशी जोडलेले असल्याने तक्रारीची दखल तात्काळ घेतली जाईल आणि संबंधित विभागामार्फत पीडित महिलांना त्वरित न्याय मिळवून दिला जाईल, असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपल्या भाषणात समाजातील पुरुषी मानसिकता बदलण्याची गरज अधोरेखित केली. महिलांच्या अस्तित्वाच्या लढाईत जेव्हा पुरुष बांधव खांद्याला खांदा लावून उभे राहतात, तेव्हा ही लढाई जिंकण्याचे बळ अधिक मिळते, असे त्या म्हणाल्या. तसेच, महिलांना केवळ धार्मिक पोथ्या-पुराणात न अडकवता त्यांना संविधानाची जाणीव करून देणे आवश्यक आहे. मुलीला सासरी पाठवताना तिच्या हातात संविधान द्या, जेणेकरून तिला आपल्या हक्कांची प्रबळ जाणीव होईल, असे आवाहनही त्यांनी पालकांना केले.

महिला सुरक्षेबाबत बोलताना चाकणकर यांनी आयोगाच्या कामगिरीचा आढावा मांडला. गेल्या वर्षभरात मानवी तस्करीच्या मोठ्या जाळ्यातून ७२ महिलांची सुटका करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बदलापूर येथील स्त्रीबीज विक्री प्रकरण आणि ठाणे, जळगाव, नाशिक येथील अवैध वैद्यकीय केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. महिलांनी आपल्या कार्यस्थळी अंतर्गत तक्रार समिती आहे का याची खात्री करावी आणि मोबाईलमधील पॅनिक बटणचा वापर करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# नारीशक्तीचा जागतिक प्रवास : समतेच्या स्वप्नाकडून सशक्तीकरणाच्या वास्तवाकडे



दरवर्षी ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर स्त्रीच्या संघर्षांचा, कर्तृत्वाचा, स्वाभिमानाचा आणि समतेच्या आकांक्षेचा इतिहास पुन्हा एकदा स्मरणात आणणारा आणि भविष्याच्या दिशेने नवी प्रेरणा देणारा दिवस आहे. १९व्या शतकाच्या अखेरीस आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीनंतर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठू लागला. कामगार चळवळींमध्ये स्त्रियांनी समान वेतन, सुरक्षित कामाचे तास आणि मतदानाचा अधिकार यांसाठी संघर्ष सुरू केला. या संघर्षाचे संघटित रूप १९०८ मध्ये अमेरिकेत पाहायला मिळाले. पुढे १९१० मध्ये कोपनहेगन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जर्मन समाजवादी नेत्या क्लारा झेटकिन यांनी महिला दिन साजरा करण्याची कल्पना मांडली. १९११ पासून काही देशांत हा दिवस साजरा होऊ लागला आणि १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने अधिकृत मान्यता दिल्यानंतर त्याला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आजचा महिला दिन हा स्त्रीसमानतेच्या दीर्घ आणि खडतर प्रवासाचा प्रतीकात्मक टप्पा आहे.

भारतीय समाजरचनेत स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. प्राचीन काळात स्त्री ला देवी समान मानले गेले असले, तरी व्यवहारात स्त्रीला अनेक मर्यादा आणि बंधनांचा सामना करावा लागला. मध्ययुगीन काळात सामाजिक रूढी परंपरांनी स्त्रीच्या शिक्षणावर, स्वातंत्र्यावर आणि सहभागावर बंधने आणली गेली होती. तथापि, १९व्या शतकात समाजसुधारकांच्या चळवळींनी या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यास सुरुवात केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली; राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या उच्चाटनासाठी लढा दिला; पंडिता रमाबाई यांनी विधवाशिक्षणाचा प्रसार केला. या सुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीसमानतेचा पाया घातला गेला. स्वातंत्र्यलढ्यातही स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली यांसारख्या अनेक महिलांनी नेतृत्व, त्याग आणि धैर्याचे उदाहरण घालून दिले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट उच्चार केला. भारतीय राज्यघटनेमधील कलम १४, १५ आणि १६ यांनी कायद्यापुढे समानता, लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई आणि समान संधीची हमी दिली. यामुळे स्त्रीच्या अधिकारांना संवैधानिक आधार मिळाला आहे. पुढील काळात स्त्रियांच्या संरक्षणासाठी आणि सशक्तीकरणासाठी अनेक कायदे व योजना राबविण्यात आल्या आहेत. स्त्रीहक्क कायदे, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मातृत्व लाभ कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा इत्यादींनी स्त्रीसुरक्षेला बळ दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे लाखो महिलांना राजकीय प्रक्रियेत थेट सहभागाची संधी मिळाली आहे. आज ग्रामपंचायतपासून संसदेपर्यंत महिलांचे प्रतिनिधित्व वाढताना दिसते; तरीही संख्यात्मक वाढीबरोबर गुणवत्तापूर्ण आणि प्रभावी सहभागाची आवश्यकता आहे.

शिक्षण हा स्त्रीसशक्तीकरणाचा मूलाधार आहे. मागील काही दशकांत मुलींच्या शालेय प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे. उच्चशिक्षणातही मुलींचे प्रमाण वाढत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, कला आणि संशोधन या सर्व क्षेत्रांत महिलांनी आपली छाप पाडली आहे. विज्ञानक्षेत्रात कल्पना चावला यांचे अंतराळयात्रेतील योगदान प्रेरणादायी ठरले आहे; क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधू, मेरी कोम यांनी जागतिक स्तरावर यश संपादन केले आहे; राजकारणात इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व केले आहे. या उदाहरणांमधून स्त्रीच्या क्षमतेला योग्य संधी मिळाल्यास ती कोणतेही शिखर गाठू शकते, हे अधोरेखित होते. तथापि, प्रगतीच्या या वाटचालीत अनेक आव्हाने अजूनही कायम आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या संधींमध्ये तफावत दिसून येते. काही ठिकाणी मुलींचे शिक्षण माध्यमिक स्तरानंतर खंडित होते. लवकर लग्न, कुपोषण, आरोग्यसेवेची अपुरी उपलब्धता, लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसा, मानवी तस्करी, कार्यस्थळी छळ, वेतनातील असमानता अशी विविध स्वरूपे स्त्रीच्या विकासाला अडथळा निर्माण करतात. डिजिटल युगातही महिलांचा तंत्रज्ञानातील सहभाग तुलनेने कमी आहे. सायबर छळासारख्या नव्या समस्या उभ्या राहत आहेत. म्हणूनच महिला दिन हा केवळ गौरवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवसही आहे. आर्थिक सशक्तीकरण हा स्त्रीच्या स्वावलंबनाचा कणा आहे. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनी बचत, सूक्ष्म वित्त आणि लघुउद्योगाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, खाद्यप्रक्रिया उद्योग अशा विविध उपक्रमांत महिलांचा सहभाग वाढत आहे. शहरी भागात उद्योजकतेकडे महिलांचा कल वाढत असून स्टार्टअप संस्कृतीतही त्या पुढे येत आहेत. मात्र, भांडवलाची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार आणि कौशल्यविकास यांसाठी अधिक धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे. समान वेतनाची अंमलबजावणी आणि कार्यस्थळी सुरक्षित वातावरणाची हमी देणे ही शासन व समाज दोघांची जबाबदारी आहे. सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर स्त्रीची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. माध्यमांमध्ये स्त्रीचे वस्तुकरण टाळणे, मुलगा मुलगी भेदभाव नष्ट करणे, घरगुती जबाबदाऱ्या समसमान वाटून घेणे, पालकत्वाची जबाबदारी दोघांनी स्वीकारणे या मूल्यांचा प्रसार झाला पाहिजे. लिंगसंवेदनशील शिक्षण आणि समाजीकरणामुळे पुढील पिढी अधिक समताधिष्ठित विचार स्वीकारू शकेल. महिला दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात; परंतु या उपक्रमांचा परिणाम वर्षभर टिकणारा असणे महत्त्वाचे आहे.

आजच्या काळात स्त्री नेतृत्वाचे विविध आयाम दिसून येतात. प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण, कला, साहित्य, माध्यमे अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील महिला सरपंचांनी गावविकासाची दिशा बदलली आहे; स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे; संशोधक महिलांनी नवकल्पना साकारल्या आहेत. या सर्व उदाहरणांमुळे स्त्रीशक्तीचे व्यापक आणि बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते. मात्र, प्रतिनिधित्वाची संधी सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, यासाठी संरचनात्मक अडथळे दूर करणे आवश्यक आहे.


आंतरराष्ट्रीय पातळीवरही महिला सशक्तीकरण हा विकासाचा प्रमुख अजेंडा ठरला आहे. लिंगसमानता ही शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी, राजकीय सहभाग आणि हिंसामुक्त जीवन या सर्व घटकांचा समावेश लिंगभाव न्यायात होतो. महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक देश आपापल्या प्रगतीचा आढावा घेतो आणि उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी धोरणे आखतो. भारतानेही 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ', 'उज्ज्वला', 'सुकन्या समृद्धी' यांसारख्या योजनांद्वारे मुलींच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न केला आहे; परंतु या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती तितकीच गरजेची आहे.

स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न केवळ महिलांचा नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे. ज्या समाजात स्त्रीला सन्मान, सुरक्षा आणि संधी मिळतात, तो समाज अधिक सर्जनशील, समताधिष्ठित आणि प्रगतिशील बनतो. घर, शाळा, कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवन या सर्व स्तरांवर लिंगसमानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. पुरुषांनीही या परिवर्तन प्रक्रियेत सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे. कारण समानतेची लढाई ही परस्पर विरोधाची नसून सहकार्याची आहे. महिला दिन आपल्याला भूतकाळातील संघर्षांची आठवण करून देतो, वर्तमानातील यशाचा गौरव करतो आणि भविष्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो. आज घोषणांपेक्षा कृतीची, प्रतीकात्मक सन्मानापेक्षा वास्तविक संधींची आणि तात्पुरत्या उत्साहापेक्षा सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. प्रत्येक मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण, आरोग्यसेवा आणि स्वप्नपूर्तीची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक महिलेला निर्णयप्रक्रियेत स्थान, आर्थिक स्वावलंबन आणि सन्माननीय आयुष्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

८ मार्चचा दिवस हा केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून समाजपरिवर्तनाची प्रेरणा आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाला मान्यता देताना तिच्या वेदनांना आणि संघर्षांना विसरून चालणार नाही. समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, समाज आणि कुटुंब या तिन्ही स्तरांवर एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. नारीशक्तीचा सन्मान, संरक्षण आणि सशक्तीकरण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
समाजशास्त्राचे अभ्यासक

# महिला दिन : आईने मुलाला समानतेची दीक्षा देण्याचा दिवस



'जागतिक महिला दिन' (८ मार्च) हा केवळ साजरा करण्याचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा, नव्या संकल्पांचा आणि पुढच्या पिढीसमोर नवा आदर्श ठेवण्याचा दिवस आहे. समाज परिवर्तनाच्या वाटचालीत स्त्री-पुरुष समानतेचा विचार हा केवळ घोषवाक्य न राहता तो घराघरात कृतीत उतरला पाहिजे. त्यासाठी पुरुषांच्या तुलनेत महिलांनी काकणभर पुढे सहभाग नोंदवला पाहिजे. त्यासाठी आपापल्या घरातील मुलींना नव्हे मुलांना लिंग समानतेचा संदेश देण्याची, आजची खरी गरज आहे.

राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण, गृह, सामाजिक न्याय, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व जवळपास सर्वच विभागामार्फत महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना व धोरण राबवले जाते. राज्य महिला आयोगही स्वतंत्रपणे काम करते. मात्र शासनासोबतच समानतेच्या शिक्षणाची घराघरात प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे.

भारतीय समाजाने परंपरांचा वारसा जपला आहे; या परंपरांमध्ये पितृसत्ताक विचारांचा पगडा अद्यापही दिसून येतो. घरामध्ये मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, वागणूक आणि प्रोत्साहन मिळणे अजूनही सर्व स्तरांवर पूर्णत्वास गेलेले नाही. मुलाने कसे वागावे, मुलीने कसे वागावे, कोणते कपडे योग्य आणि कोणते अयोग्य, अशा अनेक पूर्वग्रहांनी अजूनही अनेक घरांची दारे बंदिस्त आहेत. या बंद दारांना उघडण्याची किल्ली म्हणजे शिक्षण,संवाद आणि आधुनिक दृष्टिकोन. आजच्या नवशिक्षित व अशिक्षित मातांनीही नव्या समाज निर्मितीसाठी आपले हे दायित्व समजून घेणे म्हणजे महिला दिन साजरे करणे होय.

लहानपणापासूनच मुलांना 'हे मुलांचे काम, हे मुलींचे काम' असे शिकवले तर त्यांच्या मनावर लिंगभेदाचे ठसे उमटतात. यामुळेच आपल्यापेक्षा वयस्क आईला पिण्याचे पाणी हातात मागणारी, जेवणाचे ताट धुवायला लावणारी, आंघोळीनंतर स्वत:ची चड्डी बनियनही धुवायला लावणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. एकीकडे 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' म्हणायचे आणि स्वतःचे ताट आईला धुवायला लावायचे. यामध्ये सर्वात वाईट म्हणजे आईने म्हातारपणाची काठी म्हणून धन्यता मानायची, ही संस्कृती आपल्यातला लिंगभेद कधीही नष्ट करणार नाही. त्यामुळे मुलगा असो की मुलगी लहानपणापासूनच घरकाम, खेळ, बालसंगोपन, आई-वडिलांच्या म्हातारपणाची जबाबदारी , आर्थिक निर्णयप्रक्रिया यामध्ये समान सहभागाची सवय लावणे गरजेचे आहे. किंबहुना घरातील वडिलांनी याबाबत आदर्श पुढे ठेवणे गरजेचे आहे.

सहशिक्षण आणि परस्पर आदराची जाणीव ही समतेची पहिली पायरी आहे. शाळा आणि घर या दोन्ही ठिकाणी 'आपली मैत्रीण ही कुणाची तरी बहीण आहे' आणि 'आपल्या बहिणीलाही मित्र असू शकतो' ही सहज आणि सन्मानपूर्वक मान्यता देणे,ती मुलांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर स्त्री व पुरुष या लिंगासोबत एक तृतीय लिंगी समाज आपल्याच घरातून तयार होतो. अशा मुलांना मुलगा किंवा मुलगी म्हणून नैसर्गिक बदलानुसार जगण्याचे स्वातंत्र्य आहे. अशा तृतीय पंथीयांना देखील सन्मानाने जगण्याचा तुमच्या सारखाच अधिकार आहे, ही जाणीव मुलांना लहाणपणीच होणे आवश्यक आहे. ही जाणीव मुलांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनवते.

वयात येणे ही प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्या आयुष्यातील नैसर्गिक प्रक्रिया आहे. या विषयांवर घराघरांत मोकळेपणाने, वैज्ञानिक दृष्टीकोनातून चर्चा होणे आवश्यक आहे. लैंगिक शिक्षण ही संस्कृतीवरील घाला नसून नव्या विज्ञानवादी संस्कृतीची पायाभरणी आहे. माध्यमिक शिक्षणात प्रजनन आणि लैंगिक आरोग्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळाल्यास गैरसमज, भीती आणि चुकीच्या समजुती दूर होऊ शकतात. अगदी लहान वयातच 'गुड टच बॅड टच' याची माहिती मुलांना देणे हे त्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा शिक्षणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होतात.सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतामध्ये घरात होणाऱ्या लैंगिक शोषणाला, नात्यात होणाऱ्या लैंगिक शोषणाला या छोट्याशा गोष्टीमुळे पायबंद बसू शकतो, हे लक्षात घेण्याचाही आजचा दिवस आहे.

घरामध्ये आईची भूमिका या परिवर्तनात अत्यंत महत्त्वाची ठरते. आई ही केवळ कुटुंबाची आधारवड नसून मूल्यांची पहिली शाळा असते. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेद न करता दोघांनाही समान प्रेम, समान शिस्त, समान जाणीव आणि समान संधी देणे हे तिच्या हातात आहे. मुलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, मुलींना स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य देणे, महिलांप्रती मुलांमध्ये आदर निर्माण करणे, या कृतीतून समतेचा पाया मजबूत होतो. कुणाचीही बहिण असो, तिच्यासोबत कसे वागावे, याचे बाळकडून प्रत्येक घरातील आईनेच देणे महत्वाचे आहे. घरातून हा भेद नाकारला, घरातून त्यासाठी कृतीशील वस्तूपाठ अंमलात आला तर 'निर्भया' प्रकरणासारख्या घटना देशात घडणार नाही. या पायाभरणीची शपथ घेण्याचाही आजचा दिवस आहे.

संपत्ती आणि वारसा या संदर्भातही समानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. 'बायकांना व्यवहारात ठेवू नये ', 'महिलांना व्यवहारातले काय कळते ', या पूर्वापार अंधश्रद्धांना दूर करण्याचाही आजचा दिवस आहे.

शेतीच्या काही गुंठ्यांसाठी सही करण्यापुरतीच बहिणीची भूमिका मर्यादित नाही, हे समजून घेतले पाहिजे. जमिनीच्या बाबत तिचे स्वप्न, तिची मेहनत आणि तिचे निर्णय यांनाही स्थान असायला हवे. लहानपणापासूनच मुलींना आर्थिक साक्षरता, मालमत्तेची जाणीव आणि स्वावलंबनाचे शिक्षण देणे ही नव्या समाजव्यवस्थेची गरज आहे. यासाठी स्वतः आईने या समान हक्काची पेरणी लहानपणीच करण्याचा आजचा दिवस आहे.

कर्मकांड आणि रूढीपरंपरांमध्ये स्त्रियांच्या शुद्ध-अशुद्धतेच्या मान्यता आजही काही ठिकाणी आढळतात. परंतु नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया ही कोणत्याही प्रकारे अपवित्रतेचे लक्षण नाही. देवाला जर काही अपवित्र वाटले असते तर त्यांनी ही क्रियाच निर्माण केली नसती.त्यामुळे शुद्ध अशुद्ध हा भेद कर्मकांडातूनच निर्माण झाला आहे.मासिक पाळी हा स्त्रीदेहाचा नैसर्गिक भाग आहे. यावर खुली चर्चा झाली पाहीजे. या काळात स्त्रियांना वेगळे ठेवणे, त्यांच्या हातचे अन्न न खाणे किंवा धार्मिक विधींमध्ये सहभागी होऊ न देणे या कालबाह्य समजुतींना आता तिलांजली देणे आवश्यक आहे. विज्ञाननिष्ठ, विवेकी आणि संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारून अशा रूढींचा पुनर्विचार करणे हीच खरी संस्कृतीची प्रगती आहे. यातूनच आपली संस्कृती प्रगल्भ होईल. संस्कृती, धर्म, रुढी,परंपरांच्या नावाखाली ज्या घरांमध्ये हा अघोरी उच्छाद सुरू आहे, ती घरे सुसंस्कृत समजायची का यावर चिंतन करण्याचाही आजचा दिवस आहे.

सामाजिक व्यवहारातही समानतेची जाणीव महत्त्वाची आहे. मुलगी सासरी जाणे हीच एकमेव दिशा नसून घरजावई होणेही तितकेच सन्माननीय असू शकते, ही मानसिकता समाजात रुजवणे आवश्यक आहे. त्यामुळे जशी आपली मुलगी सासरी जाऊ शकते तसाच आपला मुलगा घर जावई जाऊ शकतो, हे सामाजिक सत्य बिंबविण्याचाही आज दिवस आहे.

कार्यालयातील महिलांच्या पेहरावावर किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उपरोधिक टिप्पणी करणे ही सवय थांबली पाहिजे. एखाद्या महिलेच्या पोशाखाबद्दल नकारात्मक प्रतिक्रिया देणे हे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा अपमान तर आहेच, पण आपल्यातील समतेच्या शिक्षणातील उणीवही दर्शवते.परस्पर आदर आणि व्यावसायिकता ही आधुनिक समाजाची ओळख असली पाहिजे.

आजच्या भारतात अशी परिस्थिती निर्माण व्हावी की अर्ध्या रात्री एकटा जाणारा मुलगा आणि एकटी जाणारी मुलगी, या दोघांच्या सुरक्षिततेत कोणताही फरक उरू नये. ही सुरक्षितता केवळ कायद्याने नव्हे, तर घराघरातल्या संस्कारांनी निर्माण होते. मुलगा आणि मुलगी यांच्यातील अंतर कमी करून, त्यांना समानतेचे आणि सहजीवनाचे मूल्य शिकवूनच हा बदल साध्य होईल.तो बदल साधण्यासाठी वचनबद्ध होण्याचा आजचा दिवस आहे.

जगातील अनेक देशांनी लिंग समानतेच्या दिशेने सातत्याने प्रयत्न केले आहेत. उदाहरणार्थ स्वीडन, नॉर्वे, फिनलँड या देशांमध्ये पालकत्व रजेचे धोरण स्त्री-पुरुष दोघांसाठी समान आहे. त्यामुळे मुलांची जबाबदारी केवळ आईची हा समज आपोआप कमी झाला.

आइसलँड या देशाने समान कामासाठी समान वेतन हा कायदा कठोरपणे अंमलात आणला. न्यूझीलंडने राजकीय नेतृत्वात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवून सामाजिक दृष्टिकोनात बदल घडवून आणला.

पाश्चात्त्य देशांमध्ये लिंगभेदाची समस्या पूर्णतः संपली असे म्हणता येणार नाही; परंतु ती कमी निश्चित झाली आहे. यासाठी वयाला अनुरूप लैंगिक शिक्षण अनिवार्य आहे. त्यामुळे शरीर, भावना आणि परस्पर आदर याबाबत खुला संवाद निर्माण झाला. भारतीय घटनेनेही कलम १४ व १५ अन्वये लिंगभेद अमान्य केला आहे.

१९०८ मध्ये महिला कामगारांनी न्यूयार्कमध्ये समान हक्कासाठी लढा उभारला. त्यातूनच १९११ पासून आस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनीत महिला दिनाची सुरुवात झाली. संयुक्त राष्ट्राने ८ मार्च १९७५ ला महिला दिनाला मान्यता दिली. असा हा दीर्घ प्रवास आहे. हा उत्सवाचा दिवस असावाच पण हक्काच्या लढयाची त्यामध्ये जाणीवही असावी. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारू या आपल्या घरात, आपल्या वागण्यात, आपल्या शब्दांत समतेचा संदेश कितपत दिसतो? जर हा संदेश अजून अपुरा असेल, तर आजपासून त्याची सुरुवात करू या. मुलांच्या मनात आदर, संवेदनशीलता आणि समानतेची बीजे पेरू या. कारण आजची मुलेच उद्याचा समाज घडवणार आहेत. त्यामुळे लिंगभेद विरहित समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा आजचा दिवस आहे.

त्यामुळे आजचा महिला दिवस साजरा करताना स्वतःच्या स्वातंत्र्य समता आणि प्रगती सोबतच आपल्या घरातील मुलांना देखील या बदलाचे साक्षीदार बनविण्यासाठी स्वतः महिलांनी प्रयत्न करणे पुरुषांनी देखील ही बाब समजून घेणे औचित्यपूर्ण ठरणार आहे.

चला तर घराघरातील मुलांना लिंग समानतेचा संदेश आपल्या वागण्यातून आणि संस्कारांतून देऊया. हीच खरी महिला दिनाची सार्थकता ठरेल.

**– प्रवीण टाके,**
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर
९७०२८५८७७७

# तुप्पा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ७४२ सातबारा व ५१२ आठ-अ उताऱ्यांचे वाटप; ४५ जणांना संजय गांधी योजनेचा लाभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील पहिले शिबिर तुप्पा येथे उत्साहात पार पडले. विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले.

तहसील कार्यालय, नांदेड यांच्यावतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. यामध्ये ७४२ ऑनलाईन सातबारा उतारे व ५१२ आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच ४५ पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले.

शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या.

या कार्यक्रमास आमदार आनंदराव बोंढारकर तसेच उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी मार्गदर्शन केले.

तहसीलदार संजय वारकड यांनी प्रास्ताविकातून अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली. नायब तहसीलदार माचेवाड यांनी सूत्रसंचालन केले, तर स्वप्नील दिगलवार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.



पुरवठा निरीक्षक रवींद्र राठोड यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण केले.

तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी उपस्थित राहून अभियानास सहकार्य केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी संतोष अस्कूलवार तसेच तलाठी गौतम पांढरे, योगिता अण्णमवार आणि दिलीप पवार यांनी विशेष योगदान दिले. तसेच तलाठी तालुका संघटनेचे अध्यक्ष अंकुर सकवान, सचिन उपरे, मंडळ अधिकारी अनिरुद्ध जोंधळे, शिवानंद स्वामी, येलमट्टी व बडवणे यांनीही सहकार्य केले.

शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



# युवासेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत शिंदे यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एका गरीब कुटुंबाला घर बांधण्यास केली मदत

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** मानव सेवा हीच ईश्वर सेवा या तत्वाला कृतीची जोड देत युवासेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत अंकुशराव शिंदे यांनी सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले आहे त्यांनी सामाजिक कार्यातून गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना सायकल वाटप एक दिवा अंधारातील कुटुंबासोबत दरवर्षी दिवाळी साजरी अशे अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत

वसमत तालुक्यातील धनोरा येथील गरीब कुटुंबातील मनोज मस्के या व्यक्तीची परिस्थिती बघून युवासेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत शिंदे यांच्या तर्फे मस्के कुटुंबियाना सामाजिक मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्या होणाऱ्या एक नवीन सुबक घराचे उद्घाटन युवासेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत शिंदे यांच्या शुभ हस्ते नारळ फोडून घर बांधकामास सुरुवात करण्यात आली होती

त्या प्रसंगी धनोरा गावचे सरपंच राजू येंगडे मोहन मस्के अमोल मस्के नारायण मगर शिवम साखरे शुभम अंभोरे सोनू गायकवाड विष्णु रुद्राक्ष गोपाळ अंभोरे साईनाथ शिंदे महेश मस्के लिंबाची मस्के लिंबाची येंगडे रेशमाची मस्के दासराव मस्के भानुदास कदम नागनाथ येंगडे विनोद येंगडे गौतम येंगडे किसन मस्के बाबुराव येंगडे उपस्थित होते.

# प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधी येथे एनक्यूएएस राज्यस्तरीय मूल्यांकन संपन्न; आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर एनक्यूएएस टीमकडून समाधान

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधी (ता. उमरी, जि. नांदेड) येथे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक (एनक्यूएएस) अंतर्गत राज्यस्तरीय मूल्यांकन प्रक्रिया नुकतीच उत्साहात पार पडली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या पूर्वतयारीबद्दल आणि आरोग्य केंद्राच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल मूल्यांकन समितीने विशेष समाधान व्यक्त केले आहे.

प्रमुख उपस्थितांची उपस्थिती

या मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय समितीचे प्रतिनिधी म्हणून डॉ. सुहास



वाहूळे (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय मालेगाव, वाशिम) आणि डॉ. वसुंधरा खैरे (दक्षता मेंटर, जिल्हा हिंगोली) यांनी उपस्थित राहून केंद्रातील विविध विभागांची बारकाईने पाहणी केली.

* प्रशासकीय मार्गदर्शन: हे मूल्यांकन यशस्वी करण्यासाठी डॉ. संगीता देशमुख आणि डॉ. संजय पेरके यांनी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन व सहकार्य केले.

* लक्ष्य २०२६: शासनाच्या उद्दिष्टानुसार डिसेंबर २०२६ पर्यंत ५० टक्के उपकेंद्रे आणि ७५ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रे एनक्यूएएस मानांकित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

* स्थानिक टीमचे प्रयत्न: तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन देवराई, डॉ. सोहेल, आणि प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हमंद यांच्यासह सर्व आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका मूल्यांकनावेळी उपस्थित होते. * समन्वय: जिल्हा परिषदेचे जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक (डीक्यूएसी) डॉ. शामसुंदर लोखंडे यांनी या संपूर्ण प्रक्रियेत समन्वयक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली.

सिंधी आरोग्य केंद्रात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा, स्वच्छता, दप्तर तपासणी आणि तांत्रिक बाबींची पूर्तता पाहून समितीने सकारात्मक दाद दिली आहे. या मूल्यांकनामुळे जिल्ह्याच्या आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यास मदत होणार असून, नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याकडून खरबी वळण बंधारा व बोगदा कामाची पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी कयाधू नदीवरील खरबी येथे सुरू असलेल्या उच्च पातळी बंधारा कामाची तसेच पैनगंगा प्रकल्पातील पाणी तूट भरून काढण्यासाठी प्रगतीपथावर असलेल्या पाणी वहन प्रणालीच्या बोगद्याची आज प्रत्यक्ष जावून पाहणी केली.



खरबी उच्च पातळी बंधारा व पाणी वहन प्रणालीचे काम पूर्ण झाल्यानंतर या बंधाऱ्यात सुमारे दोन दलघमी पाणीसाठा निर्माण होणार असून, अंदाजे ३०० हेक्टर क्षेत्रावर सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या उच्च पातळी बंधाऱ्याचे काम पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती कार्यकारी अभियंता प्रसाद लांब यांनी यावेळी दिली.

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांतर्गत पैनगंगा नदीवर इसापूर धरण व कयाधू नदीवर सापळी धरण बांधण्याचा प्रस्ताव होता. मात्र शेतकऱ्यांच्या विरोधामुळे सापळा धरण रद्द करण्यात आला. त्यामुळे पैनगंगा प्रकल्पामध्ये सुमारे १९९ दलघमी पाण्याची तूट निर्माण झाली आहे. ही तूट भरून काढण्यासाठी खरबी उच्च पातळी बंधाऱ्यातून पावसाळ्यात इसापूर धरणाकडे पाणी वळविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कयाधू नदीचा कमाल पुराचा विसर्ग ३०९९.९१ घनमीटर प्रति सेकंद इतका असून, त्यापैकी सुमारे ६० घनमीटर प्रति सेकंद पाणी इसापूर धरणाकडे वळविण्यात येणार आहे.

या प्रकल्पांतर्गत हिंगोली जिल्ह्यातील सुमारे १७ हजार ५०२ हेक्टर क्षेत्रावर सिंचन निर्मिती झाली असून, हे काम पूर्ण झाल्यानंतर अवर्षणग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी शेनोडीरामवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचाही आढावा घेण्यात आला. या योजनेद्वारे सुमारे ५ हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन निर्मिती होणार असल्याचे सांगण्यात आले. सर्वे क्षणाचे काम तातडीने पूर्ण करून पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# कंधार तालुक्यात शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार उघड; वंजारवाडी व पांगरा तांडा येथील जि.प. शाळांना कुलूप

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

कंधार – कंधार तालुक्यातील शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून वंजारवाडी आणि पांगरा तांडा येथील जिल्हा परिषद शाळांना शाळेच्या वेळेतच कुलूप ठोकलेले आढळल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे शिक्षक गैरहजर असल्याचा धक्कादायक प्रकार गटविकास अधिकारी महेश पाटील यांच्या अचानक भेटीदरम्यान उघडकीस आला.

मिळालेल्या माहितीनुसार, गटविकास अधिकारी महेश पाटील यांनी कंधार तालुक्यातील विविध कामांची पाहणी करण्यासाठी अचानक दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी वंजारवाडी व पांगरा तांडा येथील जिल्हा परिषद शाळांना भेट दिली असता शाळेच्या वेळेतच दोन्ही शाळा बंद असल्याचे दिसून आले. शाळेच्या आवारात विद्यार्थी नव्हते आणि वर्गखोल्यांना कुलूप लागलेले होते. चौकशी केल्यानंतर संबंधित शिक्षक शाळेत उपस्थित नसल्याचे स्पष्ट झाले.





या प्रकारामुळे शिक्षण विभागातील शिस्तीचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे समोर आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी असलेल्या शिक्षकांकडूनच अशी निष्काळजीपणा होत असल्याने पालकांमध्येही संताप व्यक्त केला जात आहे. आधीच ग्रामीण भागात शिक्षणाची स्थिती चिंताजनक असताना शिक्षकांच्या अशा गैरहजेरीमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

घडलेल्या प्रकारामुळे संतप्त झालेल्या गटविकास अधिकारी महेश पाटील यांनी संबंधित शिक्षकांना तत्काळ कारण दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच या प्रकरणाचे स्पष्टीकरण समाधानकारक नसल्यास दोषी शिक्षकांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देशही त्यांनी दिले आहेत.

> ‘‘शाळा बंद ठेवून कर्तव्यात कसूर करणाऱ्या शिक्षकांची गय केली जाणार नाही. नोटीसचे उत्तर मिळताच पुढील कारवाई निश्चित केली जाईल.’’
> **– महेश पाटील,**
> गटविकास अधिकारी, कंधार

दरम्यान, शिक्षण विभागात सुरू असलेल्या मनमानी कारभाराचे हे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षक वेळेवर उपस्थित राहत नाहीत, शाळा वेळेत सुरू होत नाहीत, अशा तक्रारी यापूर्वीही अनेकदा समोर आल्या आहेत.

मात्र त्यावर ठोस कारवाई होत नसल्यामुळे अशा प्रकारांना जणू प्रोत्साहन मिळत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

आता या दांडीबहाद्दर गुरुजींवर खरोखर कठोर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे त्यांना पाठीशी घातले जाणार, याकडे संपूर्ण कंधार तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# मयत शेतकरी महिलेच्या वारसाला एक लाख रुपयाची मदत, आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांच्या वारसांना एक लाखाची मदत

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**



**श्रीक्षेत्र माहूर –** तालुक्यातील मच्छिंद्र पारडी येथील मयत शेतकरी महिला सुनिता परसराम राठोड यांच्या वारसाला शासनाकडून मंजूर झालेली १ लाख रुपयांची मदत आज तहसील कार्यालयात प्रदान करण्यात आली. निवासी नायब तहसीलदार अरुणाताई सूर्यवंशी यांच्या हस्ते हे धनादेश सुपुर्द करण्यात आले.

सुनिता परसराम राठोड वय ४९ वर्षे यांनी १२ डिसेंबर रोजी आत्महत्या केली होती. शासनाच्या नियमानुसार, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला मदत देण्याच्या प्रक्रियेअंतर्गत ही मदत मंजूर करण्यात आली. या एकूण १ लाख रुपयांच्या मदतीचे वितरण करण्यात आले आहे.

३०,००० रुपये रोख स्वरूपात धनादेश क्र. १३३८४४ द्वारे तर ७०,००० रुपये वारसाच्या नावे पोस्ट ऑफिसच्या मंथली इन्कम स्कीममध्ये मुदत ठेव स्वरूपात जमा करण्यासाठी धनादेश क्र. १३३८४५ द्वारे मयत महिलेचे पती व कायदेशीर वारस परसराम राजू राठोड यांनी ही मदत स्वीकारली. यावेळी तहसील प्रशासनाकडून पोस्ट मास्टर यांना पत्र देऊन सदर रक्कम तत्काळ एम.आय.एस. योजनेत जमा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

याप्रसंगी निवासी नायब तहसीलदार अरुणाताई सूर्यवंशी यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार मनोज किर्तने, अव्वल कारकून कुलदीपके, तलाठी कुडमेथे, प्रफुल जाधव, पत्रकार गणेश राठोड, रामेश्वर रेणुकादास चव्हाण,यादव आडे उपसरपंच यांची प्रमुख उपस्थिती होती. शासनाच्या या मदतीमुळे पीडित कुटुंबाला मोठा आर्थिक आधार मिळाला आहे.

# जेष्ठ पत्रकार, श्री. बालाजी दत्तोपंत पाठक यांचे दु:खद निधन; सायंकाळी शासकीय वैधकीय महाविद्यालयात देहदाण

**आत्ताच एक्सप्रेस**



**हिंगोली–** शहरातील जेष्ठ पत्रकार श्री. बालाजी दत्तोपंत पाठक (वय वर्ष ५८) यांचे आज शनिवारी सकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या तिव्र धक्क्याने दुखद निधन झाले आहे.

त्यांच्या देहाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी ( जुने ग्रामीण पोलिस स्टेशनच्या पाठीमागे) हिंगोली येथे ४.३० वाजेपर्यंत देह ठेवण्यात आला होता. यावेळी अनेक पत्रकारांनी तसेच सामाजिक राजकीय व्यक्तींच्या ठिकाणी अंतर्दर्शन घेतले.

हिंगोली शहरातील ज्येष्ठ पत्रकार श्री. बालाजी दत्तोपंत पाठक यांचे आज शनिवार दि. ७ मार्च रोजी सकाळी सहा वाजता हृदयविकाराच्या तीव्र हृदयविकाराच्या धक्क्याने दुखत निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी , मुलगा डॉ. मयुर पाठक,मुलगी डॉ.वैष्णवी पाठक,सुन, यासह भाऊ प्रेस फोटोग्राफर तथा पत्रकार श्री. सुनिल पाठक यांच्या सह नातू असा मोठा परिवार आहे. हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी कणखर पत्रकारिता पत्रकरीता करणारे आणि स्वतंत्र ओळख जपणारे व्यक्तिमत्व श्री. बालाजी पाठक व्यक्तीमत्व होते. शहराच्या सामाजिक चळवळीत मोठे योगदान त्यांचे होते. सकाळी हिंगोली विधानसभेचे आमदार श्री. तानाजी मुटकुळे यांनी त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शन घेतले.

सायंकाळी ५.३० वाजता वैद्यकीय महाविद्यालयाला स्व. श्री. बालाजी पाठक यांचे देहार्पन करण्यात करण्यात आला आहे. या ठिकाणी सुद्धा माझी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण यांच्यासह प्रिंट मीडिया प्रतिनिधी, विविध चॅनलचे प्रतिनिधी , पत्रकार तसेच नातेवाईक व मित्र मंडळ उपस्थित होते. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांनी पाठक कुटुंब पत्रकार बाळू पाठक यांचा देहदान अर्पण करीत असल्याबद्दल आभार व्यक्त केले.

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
परभणी-हिंगोली व नांदेड जिल्हयासाठी
पत्रकार पाहिजेत
महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.
नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी
परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा
हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट
संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

# श्री रेणुका देवी दत्त शिखर घाटात भीषण वनवा; कोट्यावधींची वनसंपदा खाहा, जनावरे सैरभैर वनविभागाच्या दुर्लक्षाचे नागरिकांचे आरोप

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** श्री रेणुका देवी मंदिर ते श्री दत्त शिखर घाटादरम्यानच्या जंगल परिसरात भीषण वनवा लागल्याने मोठ्या प्रमाणात वनसंपदेचे नुकसान झाले आहे. या आगीत अनेक सरपटणारे प्राणी व वनौषधी जळून खाक झाल्याची माहिती समोर येत असून जंगलातील जनावरे जीव वाचवण्यासाठी सैरभैर पळताना दिसत आहेत. या प्रकाराकडे वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.



पावसाळा संपल्यानंतर जंगल परिसरात आग पसरू नये म्हणून जाळ रेषा (फायर लाईन) तयार करणे आवश्यक असते. मात्र ती तयार न केल्यामुळे श्री रेणुका देवी ते श्री दत्त शिखर घाटाच्या दरम्यान गरुड गंगा आणि आश्रम परिसरातील जंगलात मोठ्या प्रमाणात आग भडकली आहे. ही आग मंदिर परिसराकडे पसरू नये यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाविक व नागरिकांकडून केली जात आहे.

गरुड गंगा ते दत्त शिखर मार्गावरून जाणाऱ्या रस्त्यालगत पडलेल्या पालापाचोळ्यालाही आग लागल्याने संपूर्ण घाट परिसर धुराच्या लोटांनी व्यापला आहे. वन विभागाकडे आग विझवण्यासाठी आवश्यक यंत्रणा असतानाही प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. अग्निशमन वाहनाचीही उपलब्धता नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

दरम्यान, गेल्या वर्षी वृक्षलागवड मोहिमेत तयार करण्यात आलेली रोपे जंगलात न लावता रस्त्यावर टाकण्यात आल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चून तयार केलेल्या रोपांचा काहीच उपयोग झाला नसल्याचे सांगितले जात आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांच्या दुर्लक्षामुळे नैसर्गिकरीत्या उगवलेली झाडे व औषधी वनस्पती आगीत जळून नष्ट होत असल्याचा आरोपही स्थानिकांकडून केला जात आहे.

श्री रेणुका देवी ते श्री दत्त शिखर मार्गावरील पवित्र कैलास टेकडीपासून उगम पावलेल्या गरुड गंगेच्या पाण्याच्या स्त्रोताखाली असलेले पवित्र अमृतकुंड परिसरातील जंगलही या आगीत मोठ्या प्रमाणात जळून खाक झाले आहे. उन्हाळ्यात अनेक वन्य प्राणी पाणी व गारव्याकरिता या ठिकाणी आश्रय घेतात. त्यामुळे या आगीमुळे त्या परिसंस्थेचे मोठे नुकसान झाल्याची चर्चा सुरू आहे.

या घटनेची चौकशी करून जाळ रेषा तयार न करणाऱ्या संबंधित वन अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी भाविकांसह स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# विद्यार्थिनीच्या आत्महत्येप्रकरणी जीवन पाटील घोगरे विरुद्ध गुन्हा दाखल

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**नांदेड –** वसतिगृहाच्या शुल्कासाठी त्रास दिल्याच्या कारणावरून एका विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना नांदेडजवळील हडको परिसरात शुक्रवारी घडली. या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव जीवन पाटील घोगरे यांच्याविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वाजेगाव येथील आकांक्षा मुंजाजीराव गायकवाड (वय २५) ही विद्यार्थिनी हडको येथील पद्मश्री शामराव कदम होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात बीएचएमएसच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. ती जवळच असलेल्या हडको येथील जीवन पाटील घोगरे यांच्या निवासस्थानी चालविण्यात येणाऱ्या मुलींच्या हॉस्टेलमध्ये मागील एक वर्षापासून राहत होती.

शुक्रवार, ६ मार्च रोजी हॉस्टेलमधील एका खोलीत आकांक्षाने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

मृत विद्यार्थिनीच्या पालकांनी दिलेल्या फिर्यादीत वसतिगृहाचे मालक जीवन पाटील घोगरे यांनी हॉस्टेलच्या शुल्कासाठी आकांक्षाला वारंवार त्रास दिला, असा गंभीर आरोप केला आहे. या त्रासाला कंटाळूनच तिने आत्महत्या केल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, घोगरे यांच्या हॉस्टेलला कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी नसून आवश्यक सुविधा देखील उपलब्ध नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शहरातील अवैध हॉस्टेलचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मृत विद्यार्थिनीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात जीवन पाटील घोगरे यांच्याविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# मार्कंडेय मंदिरामागील कैलासमोक्ष स्मशानभूमीची कंपाऊंड भिंत पडली; सुरक्षेचा प्रश्न निर्माण

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** शहरातील मार्कंडेय मंदिरामागील कैलासमोक्ष स्मशानभूमी येथील कंपाऊंड वॉलची भिंत काही दिवसांपासून पडलेल्या अवस्थेत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. भिंत कोसळल्यामुळे स्मशानभूमी परिसर पूर्णपणे उघडा पडला असून त्या ठिकाणी जनावरे तसेच इतर व्यक्तींची ये-जा वाढली आहे.




स्मशानभूमी ही अत्यंत पवित्र व संवेदनशील जागा मानली जाते. येथे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या भावनांचा विचार करून परिसराची स्वच्छता, सुरक्षितता व शांतता राखणे आवश्यक असते. मात्र कंपाऊंड भिंत कोसळल्यामुळे या ठिकाणी अस्वच्छता वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून स्मशानभूमीची पवित्रताही धोक्यात येत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही दिवसांपूर्वीच ही भिंत कोसळली असली तरी अद्यापपर्यंत नगरपरिषदेच्या संबंधित विभागाकडून कोणतीही दखल घेतलेली दिसून येत नाही. परिणामी या ठिकाणी जनावरांचा वावर वाढला असून परिसरात कचरा साचण्याची शक्यता देखील वाढली आहे.

दरम्यान, मार्कंडेय मंदिर परिसरात भाविकांची सतत वर्दळ असते. त्यामुळे स्मशानभूमीची कंपाऊंड भिंत पडलेल्या अवस्थेत असल्याने परिसराचे सौंदर्यही बाधित होत आहे. यामुळे नागरिकांनी किनवट नगरपरिषदेने तातडीने लक्ष देऊन पडलेली कंपाऊंड भिंत लवकरात लवकर दुरुस्त करावी, अशी मागणी केली आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, स्मशानभूमीची सुरक्षितता आणि पवित्रता जपण्यासाठी मजबूत कंपाऊंड भिंत उभारणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात आणखी अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे नगरपरिषदेने त्वरित पाहणी करून या समस्येचे निराकरण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पैनगंगा नदीवरील पुलाला संरक्षणात्मक काठ नसल्याने अपघाताचा धोका; तातडीने रेलिंग उभारण्याची नागरिकांची मागणी

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

किनवट – किनवट तालुक्यातील पैनगंगा नदीवरील पुलाच्या काठाला कोणतेही संरक्षणात्मक बांधकाम नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. हा पूल परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग मानला जातो. मात्र पुलाच्या दोन्ही बाजूंना सुरक्षा काठ किंवा रेलिंग नसल्याने अपघाताचा धोका वाढल्याची चिंता स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

दररोज मोठ्या प्रमाणावर दुचाकी, चारचाकी वाहने तसेच पायी प्रवास करणारे नागरिक या पुलाचा वापर करतात. मात्र पुलावर कोणतेही संरक्षणात्मक रेलिंग नसल्याने वाहनचालकांना विशेषतः रात्रीच्या वेळी आणि पावसाळ्यात मोठा धोका पत्करावा लागतो. अंधारामुळे पुलाच्या कड्याची अचूक कल्पना न आल्यास वाहन घसरून नदीत पडण्याची भीती कायम असते.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यात नदीला पाणी वाढल्यावर परिस्थिती आणखी धोकादायक बनते. पावसाळ्यात पुलावर पाणी साचणे, रस्ता ओला व निसरडा होणे अशा परिस्थितीत संरक्षणात्मक काठ नसल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.



या संदर्भात स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा प्रशासनाचे लक्ष वेधले असून पुलावर संरक्षणात्मक काठ किंवा मजबूत रेलिंग उभारण्याची मागणी केली आहे. मात्र अद्याप संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

परिसरातील नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेऊन पुलाच्या दोन्ही बाजूंना मजबूत संरक्षणात्मक काठ किंवा लोखंडी रेलिंग उभारावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच भविष्यात संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वानोळा येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिर संपन्न

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर तालुक्यातील तीन महसूल मंडळापैकी एक असलेल्या वानोळा महसूल मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन तहसील कार्यालयामार्फत प्रभारी तहसीलदार कैलास जेठे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते

या कार्यक्रमांतर्गत उपस्थित मान्यवरांनी आलेल्या नागरिकांच्या समस्या ऐकून घेत जागेवर निराकरण केले तर काही प्रकरणे वर्ग करण्यात येऊन ठरलेल्या वेळेत त्यांना प्रमाणपत्र घरपोच प्रमाणपत्र देण्याचे सांगितले तर अनेक प्रमाणपत्र त्याच ठिकाणी नागरिकांना देण्यात आले



कार्यक्रमाचे अध्यक्ष वानोळा गावचे सरपंच सुनीता शिडाम हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी सरपंच संतराम राठोड, माजी उपसरपंच सुरेश राठोड,उपसरपंच अभिजीत राठोड, कृष्णकुमार राठोड तर प्रशासनाचे माहूर तहसीलचे प्रभारी तहसीलदार जेठे, नायब तहसीलदार श्रीमती सूर्यवंशी, श्रोते, पुरवठा विभागाचे निरीक्षक निलेश राऊत,भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक वर्षा गंबरे,दुय्यम निबंधक लता तलांडे, महावितरणचे उपअभियंता शेंडे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सहायक मॅनेजर कुंभरे,स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचे अधिकारी लक्ष्मण जंकटे,पशुवैद्यकीय अधिकारी राजगुरू, आरोग्य विभागाचे तालुका सुपरवायझर गजभारे,वैद्यकीय अधिकारी डॉक्टर भुसारे, कृषी विभागाचे उपकृषी अधिकारी सूर्यवंशी, मंडळ कृषी अधिकारी अमित पवार, कृषी सहाय्यक अधिकारी साबळे, शेवाळकर,प्रवीण शिंदे, वानोळा मंडळ अधिकारी चंदनकर, तलाठी अभिजीत कुडमेते, पेंटेवाड,तवर,ग्रामसेवक कासदेकर, पत्रकार पंडित धुप्पे,सुदाम चव्हाण, सुभाष आमटे, राजेश राठोड यांचे सह परिसरातील सरपंच उपसरपंच निराधार,अपंग लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

यावेळी अनेक गरजू लोकांना प्रमाणपत्र, सातबारा व इतर प्रमाणपत्र वाटप करण्यात आले अनेक समस्याचे लेखी निवेदन घेऊन संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आले यावेळी सूत्रसंचालन पंडित धुप्पे यांनी केले तर आभार अभिजीत राठोड यांनी मांनले.

# गोकुंदा येथे रमजान व महिला दिनानिमित्त भव्य मेहंदी स्पर्धेचे आयोजन

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** किनवट तालुक्यातील गोकुंदा येथे सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या तमन्ना ब्युटी पार्लर व जीवनरेखा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संचालिका परवीन शेख यांच्या वतीने येत्या २९ मार्च रोजी दुसऱ्यांदा भव्य मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रमजान व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात येत असलेल्या या स्पर्धेमुळे परिसरातील महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.




या स्पर्धेमध्ये विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रथम पारितोषिक ५००० रुपये, द्वितीय पारितोषिक ३००० रुपये आणि तृतीय पारितोषिक १५०० रुपये असे बक्षीस देण्यात येणार आहे. याशिवाय १० उत्तेजनार्थ पारितोषिके, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देण्यात येणार असून विजेत्या स्पर्धकाला ''किनवट मेहंदी क्वीन'' हा मानाचा किताब प्रदान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून किनवट-माहूर मतदारसंघाचे आमदार केराम साहेब, हिंगोली मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, नगरपरिषद नगराध्यक्ष सुजाताई येंद्रलवार, युवा नेते करणभाऊ येंद्रलवार, आदिलाबादचे प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट नुरी खान, नाझिया फरीन, मेकअप आर्टिस्ट पूनम, अन्याय अत्याचार निर्मूलन समिती मराठवाडा अध्यक्ष डॉ. प्रियंका राठोड, सत्य निर्मिती महिला मंडळाच्या अध्यक्ष शबाना खान (मुंबई), तसेच पुरोगामी पत्रकार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ठाकूर सा व शिखारे उपस्थित राहणार आहेत.

तरी परिसरातील महिलांनी या स्पर्धेत जास्तीत जास्त सहभाग नोंदवून आपली नावे नोंदणी करावीत, असे आवाहन आयोजक परवीन शेख मॅडम यांनी केले आहे.

# नवनिर्वाचित राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचा पप्पू चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने आज सत्काराचे आयोजन

आत्ताच एक्सप्रेस



**हिंगोली–** हिंगोली येथील श्री रामरावजी वडकुते यांची नवनिर्वाचित राज्यसभा खासदार पदी निवड झाल्याबद्दल आज दिनांक ८ मार्च दुपारी ठीक २ वाजता शिवनेरी चौक ,अकोला बायपास येथे पप्पू भाऊ चव्हाण व समस्त मित्र मंडळाच्या वतीने भव्य सत्काराचे आयोजन करण्यात असल्याची माहिती भाजपा युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा बळसोंड उपसरपंच प्रतिनिधी पप्पूभाऊ चव्हाण यांनी दिली आहे.

यावेळी नवनिर्वाचित राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांच्यासह हिंगोली विधानसभाचे आमदार तानाजीराव मुटकुळे पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे, माजी आमदार रजनीताई सातव यांची उपस्थिती राहणार आहे.या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन शिवनेरी चौक अकोला बायपास बळसोंड या ठिकाणी आयोजित केले आहे. तरी सर्व गावकऱ्यांनी व परिसरातील नगरवासीयांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात आली आहे.

# रानडुकरा पाण्याअभावी तडफडून मृत्यू, जंगलातील पाणी संपले वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांचे दुर्लक्ष

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर तालुक्याला निसर्ग कृपेने लाभलेल्या जंगलात जनावरांसाठी बनवीण्यात येणारे लघु तलाव पानवठे कागदावर झाल्याने जंगलात पाण्याचा थेंब नाही त्यामुळे पाण्यासाठी भटकणाऱ्या जंगली जनावरा पैकी एका रानडुकराचा पाण्याअभावी श्री रेणुका देवी रोडवरील उजले पीर दर्गाह पाठीमागे तडफडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे

माहूर तालुक्यात गतवर्षी जंगली जनावरांसाठी जंगलात बनविण्यात येणारे पानवटे लघु तलाव कागदावर झाल्याने एकाही ठिकाणी जंगलात जंगली जनावरांसाठी पाणी नाही तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना विनंती करूनही पवित्र इंजाळा कुंडातील गाळ उपसला गेला नसल्याने श्री रेणुका देवी ते श्री दत्त शिखर श्री अनुसया माता मंदिरापर्यंतच्या घाटात रस्त्याला लागून अनेक ठिकाणाहून पाणी येत होते ते पाणी बंद झाल्याने जंगली जनावरे पाण्यासाठी वन वन भटकत आहेत माहूर शहरापासून ते श्री रेणुका देवी मंदिरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर पाणीपुरवठा योजनेच्या लिकेज बॉलचे पाणी रस्त्यावर साचून असते ते पाणी पिण्यासाठी येत असलेल्या रानडुकराचा रस्त्यातच तडफडून मृत्यू झाला असून दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना याचा प्रचंड घाण वास येत आहे

जंगलाला लागत असलेला वनवा यासाठी कारणीभूत असून अनेक ठिकाणी पानवठे लघु तलाव बनवण्यासाठी आलेला निधी कुठे वापरला याचा पत्ता नसल्याने अनेक जनावरांचा वनव्यात पान्या अभावी तडफडून मृत्यू होत असून अनेक वानर मृत्युमुखी पडले असून जंगलाच्या आतील भागातील किती जनावरे मरून मातीमोल



झाली याचा पत्ता नसल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी पानवठे व इतर कामासाठी केलेल्या खर्चाचि चौकशी करावी आणि उपवनसंरक्षक नांदेड यांनी तात्काळ जंगलात पाण्यासाठी कृत्रिम पानवटे निर्माण करावे अशी मागणी होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813